


# आरती संग्रह

-Kajal Dadas



HAPPY

Ganesh Chaturthi

# सुख करता दुखहर्ता, वार्ता विघ्नाची

सुख करता दुखहर्ता, वार्ता विघ्नाची
नूर्वी पूर्वी प्रेम कृपा जयाची
सर्वांगी सुन्दर उटी शेंदु राची
कंठी झलके माल मुकताफळांची
जय देव जय देव, जय मंगल मूर्ति
दर्शनमात्रे मनःकमाना पूर्ति
जय देव जय देव !!

रत्नखचित फरा तुझ गौरीकुमरा
चंदनाची उटी कुमकुम केशरा
हीरे जडित मुकुट शोभतो बरा
रुन्झुनती नूपुरे चरनी घागरिया
जय देव जय देव, जय मंगल मूर्ति
दर्शनमात्रे मनःकमाना पूर्ति
जय देव जय देव !!

लम्बोदर पीताम्बर फनिवर वंदना
सरल सोंड वक्रतुंडा त्रिनयना
दास रामाचा वाट पाहे सदना
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना
जय देव जय देव, जय मंगल मूर्ति
दर्शनमात्रे मनःकमाना पूर्ति
जय देव जय देव !!

# श्री शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा,
वीषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा
लावण्य सुंदर मस्तकी बाळा,
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा॥१॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा,
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा जय देव जय देव ॥धृ॥

कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा,
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा
विभुतीचे उधळण शितकंठ नीळा,
ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा ॥२॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा,
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा जय देव जय देव ॥धृ॥

देवी दैत्यी सागरमंथन पै केले,
त्यामाजी अवचित हळहळ जे उठले
ते त्वा असुरपणे प्राशन केले,
नीलकंठ नाम प्रसिद्ध झाले ॥३॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा,
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा जय देव जय देव ॥धृ॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी,
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी,
रघुकुलटिळक रामदासा अंतरी॥४॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा,
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा जय देव जय देव ॥धृ॥

## युगे अठ्ठावीस विटेवरी उभा

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा
वामाङ्गी रखुमाईदिसे दिव्य शोभा ।
पुण्डलिकाचे भेटि परब्रह्म आले गा
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥१॥
जय देव जय देव जय पाण्डुरङ्ग ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥धृ०॥

तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी
कासे पीताम्बर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी
गरुड हनुमन्त पुढे उभे राहती ॥२॥

धन्य वेणूनाद अणुक्षेत्रपाळा
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाई राणीया सकळा
ओवाळिती राजा विठोबा सावळा ॥३॥

ओवाळू आरत्या कुरवण्ड्या येती
चन्द्रभागेमाजी सोडुनिया देती ।
दिण्ड्या पताका वैष्णव नाचती
पण्ढरीचा महिमा वर्णावा किती ॥४॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती
चन्द्रभागेमाजी स्नाने जे करिती ।
दर्शन होळामात्रे तया होय मुक्ति
केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥५॥

# येई हो विठ्ठले

येई हो विठ्ठले माझे माउली ये
निढळावरी कर...
निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहें
येई हो विठ्ठले माझे माउली ये
येई हो विठ्ठले माझे माउली ये

आलिया गेलिया हातीं धाडी निरोप
आलिया गेलिया हातीं धाडी निरोप
पंढरपुरी आहे...
पंढरपुरी आहे माझा मायबाप
येई हो विठ्ठले ...

पिवळा पितांबर कैसा गगनी झळकला
पिवळा पितांबर कैसा गगनी झळकला
गरुडावरी बैसोनि...
गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला
येई हो विठ्ठले ...

विठोबाचें राज्य आम्हा नित्य दिपवाळी
विठोबाचें राज्य आम्हा नित्य दिपवाळी
विष्णुदास नामा...
विष्णुदास नामा जीवे भावें ओवाळी
येई हो विठ्ठले ..

असो नसो भाव आम्हां तुझिया ठायां
असो नसो भाव आम्हां तुझिया ठायां
कृपादृष्टी पाहें...
कृपादृष्टी पाहें माझ्या पंढरीराया
येई हो विठ्ठले ...

# दुर्गे दुर्घट भारी

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ॥
वारी वारीं जन्ममरणाते वारी ।
हारी पडलो आता संकट नीवारी ॥ १ ॥

जय देवी जय देवी जय महिषासुरमथनी ।
सुरवरईश्वरवरदे तारक संजीवनी ॥ धृ. ॥

त्रिभुवनी भुवनी पाहतां तुज ऐसे नाही ।
चारी श्रमले परंतु न बोलावे काहीं ॥
साही विवाद करितां पडिले प्रवाही ।
ते तूं भक्तालागी पावसि लवलाही ॥ २ ॥

प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासां ।
क्लेशापासूनि सोडी तोडी भवपाशा ॥
अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लिन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥

# आरती ज्ञानराजा

आरती ज्ञानराजा महाकैवल्य तेजा,
कैवल्य तेजा सेविती साधू संत,
मनू वेधला माझा वेढला माझा, ॥ १ ॥
आरती ज्ञानराजा....

लोपले ज्ञान जगी हित नेणती कोणी,
नेणती कोणी अवतार पांडुरंग,
नाम ठेविले ज्ञानी ठेवीले ज्ञानी, ॥ २ ॥
आरती ज्ञानराजा....

कनकाचे ताट करी उभ्या गोपिका नारी,
गोपिका नारी नारद तुंबरही,
साम गायन करी गायन करी, ॥ ३ ॥
आरती ज्ञानराजा....

प्रगट गुह्य बोले विश्व ब्रम्हाची केले,
ब्रम्हाची केले राम जनार्दनी,
पायी मस्तक ठेविले मस्तक ठेविले, ॥ ४ ॥
आरती ज्ञानराजा ....

# संत तुकारामाची आरती

आरती तुकारामा ।
स्वामी सद्गुरुधामा ॥
सच्चिदानंद मूर्ती ।
पाय दाखवी आम्हा ॥ ध्रु० ॥

राघवे सागरात ।
पाषाण तारीले ॥
तैसे हे तुकोबाचे ।
अभंग उदकी रक्षिले ॥ आरती० ॥ १ ॥

तुकिता तुलनेसी ।
ब्रह्म तुकासी आले ॥
म्हणोनि रामेश्वरे ।
चरणी मस्तक ठेविले ॥ आरती० ॥ २ ॥

# संत नामदेव आरती

जन्मता पांडुरंगे | जिव्हेवरी लिहिले | शतकोटी अभंग | प्रमाण कवित्व रचिले || १ ||

जय जयाजी भक्तरायां | जिवलग नामया | आरती ओवाळिता | चित्त पालटे काया || धृ.||

घ्यावया भक्तिसुख | पांडुरंगे अवतार | धरुनियां तीर्थमिषें | केला जगाचा उद्धार || जय.|| २ ||

प्रत्यक्ष प्रचीती हे | वाळवंट परिस केला | हारपली विषमता | द्वैतबुद्धी निरसली || जय.|| ३ ||

समाधि माहाद्वारी श्रीविठ्ठलचरणी | आरती ओवाळितो | परिसा कर जोडू || जय जयाजी||४ ||

# संत एकनाथ आरती

आरती एकनाथा |
महाराजा समर्था |
त्रिभुवनी तूंचि थोर |
जगदगुरू जगन्नाथा || ध्रु. ||

एकनाथ नाम सार |
वेदशास्त्रांचे गूज |
संसारदु:ख नाम |
महामंत्राचे बीज | आरती || १ ||

एकनाथ नाम घेतां |
सुख वाटले चित्ता |
अनंत गोपाळदासा |
धणी न पुरे गातां |
आरती एकनाथा | महाराजा समर्था || २ ||

# घालीन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन ।
भावे ओवाळिन म्हणे नामा ।।

त्वमेव माता पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धु: सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ।।

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।
बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेती समर्पयामि ।।
अच्युतं केशवं राम नारायणम्
कृष्णदामोदरं वासुदेवं भजे।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम्
जानकीनायकं रामचंद्र भजे ।।

हरे राम हरे राम राम राम हरे हरे
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

# मंत्रपुष्पांजलि

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्|
ते हं नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: संति देवा:
ॐ राजाधिराजाय प्रसह्ये साहिने |
नमो वयं वैश्रवणाय कुर्महे
स मे कामान्कामकामाय मह्यम्|
कामेश्वरो वैश्रवणो ददातु|
कुबेराय वैश्रवणाय |
महाराजाय नम: ॐ स्वस्ति
साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं
माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी
स्यात्सार्वभौम: सार्वायुष आंतादापरार्धात्पृथिव्यै
समुद्रपर्यंता या एकराळिति
तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुत: परिवेष्टारो
मरुत्तस्यावसन्गृहे
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा: सभासद इति

# जय गणेश देवा

जय गणेश, जय गणेश, जय गणेश देवा ।
माता जाकी पार्वती, पिता महादेवा ॥

एक दंत दयावंत, चार भुजाधारी ।
माथे पर तिलक सोहे, मूसे की सवारी ॥

पान चड़ें, फूल चड़ें और चड़ें मेवा ।
लडुअन को भोग लगे, संत करे सेवा ॥

अंधें को आँख देत, कोड़िन को काया ।
बांझन को पुत्र देत, निर्धन को माया ॥

सूरश्याम शारण आए सफल कीजे सेवा |
माता जाकी पार्वती, पिता महादेवा ॥

जय गणेश, जय गणेश, जय गणेश देवा ॥

# धन्यवाद

Dear Devotee,

We extend our heartfelt gratitude for visiting Aarti Sangrah, your source for devotional songs and spiritual inspiration. Your presence means a lot to us, and we're thrilled to be able to share the beauty of devotion with you.

EXPLORE THE CHOICES

EE

**CONTACT US**

eliteextant.art.blog

LIKE COMMENT SHARE

Thank you!